||सिध्दिरनेकान्तात||
Estd-June 1962
Anekant Education Society's
TULJARAM CHATURCHAND COLLEGE
of Arts, Science and Commerce, Baramati, 413102
Autonomous
Religious Minority Institute
NAAC Reaccredited 'A+', CGPA 3.55
Email : principal@tccollege.org, principal.tccollege@gmail.com
Website : www.tccollege.org
☎ : (02112) 222405, 223635 Fax : (02112) 222728

# राष्ट्रीय मतदार दिन अहवाल

मंगळवार दि. २५ जानेवारी, २०२२ रोजी राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त "आझादी का अमृत महोत्सव" या उपक्रमा अंतर्गत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने "सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपुर्ण निवडणुका" या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. दादासाहेब कांबळे (प्रांताधिकारी बारामती.) सर यांनी मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर उपस्थित होते. या व्याख्यानाचा प्रारंभ दुपारी १२:०० वा. ऑनलाईन पध्दतीने करण्यात आला.

आपल्या देशाचा राज्य कारभार हा संविधानाच्या माध्यमातून चालतो. भारत हा सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. लोकशाहीमध्ये मतदारांना मतदानाच्या माध्यमातून आपले लोकप्रतिनिधी आणि सरकार निवडण्याचा अधिकार प्राप्त होतो. लोकांच्या इच्छा, आकांशा, अपेक्षांची परिपूर्ती करणारे लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदारांमध्ये मतदाना विषयी जाणीव जागृती करणे, हे सदृढ लोकशाहीसाठी आवश्यक आहे. असे मत यावेळी श्री. दादासाहेब कांबळे यांनी व्यक्त केले.

भारत हा जात, धर्म, पंथ, भाषा, संस्कृतीच्या विविधतेने नटलेला देश आहे. विविध सण उत्सवाच्या वेळी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदारांमध्ये मतदान विषयी जाणीव जागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. भारतीय लोकशाही सुदृढ करण्यासाठी नवमतदार असलेल्या विद्यार्थ्यांनी मतदान यादी मध्ये आपली नाव नोंदणी केली पाहिजे. असे आवाहन श्री. दादासाहेब कांबळे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर म्हणाले की, भारतीय लोकशाहीची वीण अतिशय सुदृढ आहे. भारतीय मतदार जागृत आहे. आज जगाचे नेतृत्व तरुणांच्या हाता मध्ये आहे. जगात सर्वात जास्त तरुणाई भारता मध्ये आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही अधिक सुदृढ करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने मतदान केले पाहिजे. विविधतेत एकात्मता असलेली भारताची समृद्ध अशी परंपरा आहे. आपल्याला मानवजातीच्या कल्याणाचे काम करायचे आहे असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी काढले.

भारतीय राज्यव्यवस्था ही तीन स्तंभावर उभी आहे. हे तिन्ही स्तंभ अतिशय चांगल्या पद्धतीने काम करत आहे. आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. जगातील पहिल्या दहा देशांमध्ये भारताच्या राज्यव्यवस्थेचे नंबर लागतो. याचे सर्व श्रेय भारताच्या संविधानकर्त, राज्यकर्त्यां बरोबर भारतीय मतदारांना दिले पाहिजे. भारतीय लोकशाही ही परिपक्वतेकडे मार्गक्रमण करत आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने सक्रिय सहभाग घेऊन मतदान यादी मध्ये नाव नोंदवली पाहिजे. प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका व जबाबदारी पार पाडली पाहिजे. असे मत यावेळी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी मांडले.

यावेळी ऑनलाइन व्याख्यानाचे संयोजक आणि राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, उपप्राचार्य डॉ. अजित तलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ.

सीमा नाईक गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा उपस्थित होते. या व्याख्यानाला मोठ्या प्रमाणात विध्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.  या कार्यक्रमासाठी ६६ विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कार्यक्रमाचे संयोजक आणि राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक यांनी करून दिला. तर सूत्र संचालन व आभार प्रा. राजू पांडे यांनी मांडले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा . प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर , उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. अजित तेलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले

ऑनलाइन राष्ट्रीय मतदार दिन **साजरा झाला. त्याची छायाचित्रे**.






डॉ हनुमंत फाटक
राज्यशास्र विभागप्रमुख